# कविता

### खलाशाचा कप्तान

निजल्या निजल्या प्रकाशाच्या सर्व ओळी
जागले जागले तेव्हा माझ्यासंगे विचारही
पापण्या मिटूनही मन कसे जागे राही
दूरवरून तारका मनातले ओळखू पाही

विचारांमध्ये गुंफलेले विचार तरी आठवू किती
रंगलेल्या रात्री का भंगलेल्या स्वप्नांच्या भिंती
तिरीप उजेडाची अन्  गार झुळूक वाऱ्याची
माझे विचार कशाला, ना कशाला जुमानी

मनाजोगता संसार तरी तगमग जीवाची
मुलांफुलांनी भरले आहे गोकुळ अंगणी
सुरळीत आहे सर्व ह्या जीवन समरी
कशाची ददात नाही सर्व कसे एकसुरी

हीच खंत आहे, वाटे मला मनोमनी
उत्साहवर्धक असे काहीच घडत नाही
नाविन्याच्या शोधात स्वप्नांमध्ये भटकूनी
अंथरूणामध्येच कसे पाय हे राहती

वेगळे काही करावयाची ओढ मनात भारी
परी पतंग बदवायला नाही पुरेशी दोरी
विचारांतली कल्पकता आचारांत येत नाही
जगण्याची गाडी कधी रूळ बदलत नाही

ह्याच नैराश्येने माझ्या जागल्या राती
समृद्धीचा सोपान कसा वेडावून दाखवी
जीवनाचे गलबत कधीतरी लागेल किनारी
खलाशाचा कप्तान होणे संभवत नाही

**अमित भावे** (लॉस अँजलिस, कॅलिफोर्निया)